महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग, पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी- 020 2566 0593
ई-मेल-dycfpune@gmail.com

क्रमांक:- अ/ कक्ष-4.2/ जमीन/ 249 /2022-23 दिनांक- 15/06/2022

प्रती,

सहाय्यक महाप्रबंधक,
भारत संचार निगम लिमिटेड,
बाजीराव रोड,पुणे

विषय - Laying of underground OFC for High –speed Broadband Connectivity to Gram Panchayat in Mulshi Block of Pune District in the State of Maharashtra (FP/MH/OFC/145751/2021)

संदर्भ- 1. मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपुर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17 /नोडल /पुणे/आयडी- 12939/578 दि.09/06/2022

2. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष 4.2/जमीन/81 दि.10/06/2022

3. उपवनसंरक्षक,वन्यजीव विभाग, ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-4/जमीन/सुधागड/307/22-23 दि.13/06/2022

विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मौजे निवे,मौजे पिंपरी व मौजे बार्पे येथिल वनक्षेत्र हे अनुक्रमे ताम्हिणी व सुधागड अभयारण्यामधील असुन उपरोक्त नमुद वन (संवर्धन) अधिनियम 1980 चे प्रस्तावाबाबत त्यास राज्य वन्यजीव संस्था यांची पुर्व परवनागी घेणे आवश्यक असल्याचे वरील संदर्भिय पत्र क्र.1अन्वये मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपुर यांनी या कार्यालयास कळविले आहे.तदअनुषंगाने या कार्यालयाकडील वरील संदर्भ पत्र क्र.2 नुसार संबंधीत वन्यजीव विभाग यांनी राज्य वन्यजीव संस्था यांचेकडे मान्यतेचा विहीत प्रपत्रातील प्रस्ताव सादर करावा असे कळविण्यात आलेले आहे.

P.T.O.

3088

प्रकरणी मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपुर,यांनी वरील संदर्भ पत्र क्र.1 मध्ये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)नागपुर यांचेकडील परिपत्रक दि.16/06/2021 व शासन परिपत्रक दि.06/09/2021 नुसार प्रस्ताव सादर करावा असे निर्देशीत केलेले आहे तरी या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधुन आपलेकडील प्रतिनिधींना या कार्यालयात उपस्थित राहणेबाबत सुचीत करावे.आपलेडील प्रतिनिधी या कार्यालयात उपस्थित राहिलेस त्यांना परिपत्रकानुसार प्रस्ताव तयार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच वरील संदर्भ पत्र क्र.3 नुसार उपवनसंरक्षक,वन्यजीव विभाग,ठाणे सुधागड वन्यजीव विभागातुन वळतीकरणासाठी जे वनक्षेत्र दर्शविले आहे त्यात तफावत येत असल्याचे या कार्यालयास कळविले आहे. तरी याबाबत त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधुन सदर पुर्तता करावी.प्रस्तावीत ओ.एफ.सी. चे कामाबाबतचा आढावा केंद्र शासनाकडुन होत आहे तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत जेणेकरुन प्रस्तावावर आवश्यक ते संस्करण करुन तो विहीत मुदतीत वरीष्ठ कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

**( राहुल पाटील,भावसे )**
**उपवनसंरक्षक,**
**पुणे वनविभाग,पुणे**

**प्रतिलिपी** - मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रतिलिपी** - मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.)पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रतिलिपी** – उपवनसंरक्षक, वन्यजीव विभाग, पुणे यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित

**प्रतिलिपी** - उपवनसंरक्षक,वन्यजीव विभाग, ठाणे यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित